स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्यविद्या विद्याशाखा अंतर्गत समाजशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (Ph.D.) पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

● संशोधनाचा विषय ●

“सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याचा समाजावरील परिणामांचा समाजशास्त्रीय अभ्यास”

● संशोधक ●

भाग्यश्री उत्तमराव बारशे

● मार्गदर्शक ●

डॉ. नानासाहेब बालासाहेब पाटील

समाजशास्त्र विभागप्रमुख

माधवराव पाटील महाविद्यालय, पालम

ता. पालम जि. परभणी

मे २०१९

“सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याचा समाजावरील परिणामांचा समाजशास्त्रीय अभ्यास”

प्रस्तावना:

आजचे युग हे विज्ञानाचे, प्रगतीचे आणि स्पर्धेचे युग आहे. शिक्षण म्हणजे जीवनाचा प्रकाश माननारे युग आहे. या शिक्षण प्रकाशाच्या माध्यमाने आज प्रत्येक व्यक्ती आपले जीवन प्रकाशमान व गतिमान करीत आहे. स्वत:चे व्यक्तीमत्व तेजोमय बनविण्याचा प्रयत्न करीत आहे. याचा प्रत्यय समाज जीवनात मोठया प्रमाणात दिसून येत आहे. शिक्षणाला मानवी जीवनाचा तिसरा डोळा मानले जाते. शिक्षणाची ही अनमोल देणगी बहुजन समाजाला सहजासहजी मिळालेली नाही. यासाठी अनेकांना हाल आपेष्ठा सहन कराव्या लागल्या, त्रास भोगावा लागला, अशातूनच समाजसुधारक जन्माला आले आणि जे अशक्य वाटत होते ते आता शक्य बनले, ते समाजसुधारकांच्या प्रेरणेमुळेच, त्यांच्या त्यागामुळेच शैक्षणिक तसेच सामाजिक स्तरावर कार्य करणाऱ्या समाजसुधारकात अग्रगण्य स्थान आहे. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जोतीबा फुले तसेच त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांच्या थोर कार्याची तुलना कोणत्याही समाजसुधारकांच्या कार्याशी होऊ शकत नाही. स्त्री शिक्षणाचा खरा पाया रचला तो महात्मा जोतीबा फुले यांनी परंतु त्यांचे हे महान कार्य खंबीरपणे त्यांना साथ देऊन तडीस नेले ते त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांनी इंग्रजी शासनाने महात्मा जोतिबा फुले यांच्या कार्याबद्दल केलेल्या सत्काराच्या उत्तरातील भाषणात महात्मा फुले यांनी सावित्रीबाईचा विशेष गौरव केला. ते म्हणाले ‘हा गौरव माझा नसून माझी पत्नी सावित्रीबाईचा आहे मी शाळा स्थापन करीत सुटलो. पण तिने अडचणीला तोंड देवून त्या सांभाळल्या वाढविल्या, मी निमित्त मात्र आहे.’ यावरून सावित्रीबाईचे शैक्षणिक या सामाजिक कार्यातील योगदान किती मोलाचे आहे हे लक्षात येते.

स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या सावित्रीबाई फुले यांनी केलेल्या कार्यामुळे स्त्री तसेच शुद्राचे जीवन अज्ञान, अंधकाराच्या भयाण युगातून प्रकाशाकडे एक प्रक्रियेच्या स्वरूपात आलेले आहे. आज असे एकही क्षेत्र नाही जेथे स्त्री पोहचली नाही आज स्त्री कामगारापासून ते राष्ट्रपती पदापर्यंत वाटचाल यशस्वीरित्या करीत आहे. ते केवळ सावित्रीबाई फुले यांच्या योगदानामुळेच महात्मा जोतीबा फुले व त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांनी विचार व कार्याने सामाजिक क्रांतीला

दिलेला आकार आणि आशय आचंबित करणारा आहे. त्यांनी सामाजिक क्रांतीला प्रेरक ठरणारे महान असे कार्य केले. त्यांच्या या कार्याचा आढावा घेताना हरी नरके लिहितात, "दिडशे वर्षापूर्वी स्त्री-पुरूष समानता आणि सामाजिक न्याय यांची चळवळ उभारण्यासाठी त्यांनी कडवी झूंज दिली. ज्ञान ही फार मोठी सत्ता असून स्त्रीचा आणि दलित- बहुजनवर्गाची उन्नती त्याच्याशिवाय होणार नाही, हे ओळखून प्रत्यक्ष शिक्षण प्रसाराच्या कार्याला त्यांनी स्वत:ला आयुष्यभर वाहून घेतले."

पुण्यात मुलींची व संपूर्ण देशात पहिली 'अस्पृश्य मुलींची शाळा' आणि 'नेटिव्ह लायब्ररी' सुरू करण्याचे श्रेय फुले दांपत्याकडेच जाते. देशातील 'साक्षरता अभियानाची' सुरूवात त्यांनीच १८५४-५५ मध्ये केली. फसविल्या गेलेल्या ब्राह्मण विधवांच्या बाळंतपणासाठी आणि त्यांच्या मुलांच्या संगोपनासाठी १८६३ साली स्वत:च्या घरात त्यांनी 'बालहत्या - प्रतिबंधक गृह' काढले. सत्यशोधक समाज स्थापन करून हुंड्याशिवाय कमी खर्चातील साध्या पध्दतीच्या सत्यशोधक विवाहाची प्रथा सुरू केली. स्वत:च्या घरातील पाण्याचा हौद अस्पृश्यासाठी खुला करून जाती निर्मूलनाच्या कार्याला थेट हात घातला. बालविवाहांना विरोध करून ते थांबले नाहीत तर विधवांचे पुर्नविवाह त्यांनी समारंभपूर्वक घडवून आणले. स्वत:ला मुल- बाळ झाले नाही तर एक ब्राह्मण विधवेचा मुलगा दत्तक घेवून त्याला वैद्यकीय शिक्षण दिले आणि त्याचा आंतरजातीय विवाह करून दिला. देशातील शुद्रातिशुद्रासाठी समग्र सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक चळवळ उभारण्याचे क्रांतीकारक असे ऐतिहासिक कार्य या जोडप्यानी केले. सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक तसेच सामाजिक कार्याचा समाजावरील परिणामांचा समाजशास्त्रीय अभ्यास सदरील शोधप्रबंधात करणार आहे.

विषय निवड:

प्रस्तुत संशोधनासाठी विषय निवडत असताना मी **"सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याचा समाजावरील परिणामांचा समाजशास्त्रीय अभ्यास"** या विषयाची निवड केली. कारण आज सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याचा समाजाला पडलेला विसर तसेच आजही सामाजिक विषमता पूर्णपणे नष्ट झालेली नाही. बहुजन समाज हा अजूनही सुधारणेच्या प्रक्रियेत आहे. त्यामुळेच सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक

कार्याची आजही समाजाला गरज आहे.

सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याचा समाजशास्त्र विषयात समावेश केल्यामुळे त्यांच्या कार्याला वेगळेच महत्व प्राप्त झाले. जोतीबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्यावर आत्तापर्यंत २०० पेक्षा अधिक ग्रंथ लिहिले गेले आहेत. त्यापैकी सावित्रीबाई फुले यांच्यावर ४० पेक्षा अधिक ग्रंथ आहेत. सर्वात प्रथम जेव्हा मी, श्रीमती सरोज देशपांडे लिखित स्त्रीभूषण सावित्रीबाई फुले हे पुस्तक वाचत असताना मला सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याचा अंदाज आला.

सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक आणि सामाजिक कार्य एक समाजशास्त्रीय अध्ययन हा विषय मी एम. फिल पदवीसाठी निवडला होता. या विषयात अजून संशोधन करण्याच्या उद्देशाने मी माधवराव पाटील कला महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागप्रमुख माझे मार्गदर्शक गुरू डॉ. नानासाहेब पाटील सर यांना विचारले असता त्यांनी मला सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक आणि सामाजिक कार्य समाजशास्त्रीय अध्ययन हा विषय निवडण्याची परवानगी दिली. तसेच वेळोवेळी मला त्यात सुधारणा सुचविल्या. तरी प्रस्तुत संशोधन विषय त्यांच्या सहमतीने निवडलेला आहे.

विषय निवडीचा हेतू/ उद्दिष्ट्ये:

शास्त्र कोणतेही असो प्रत्येक शास्त्रातील संशोधनाला निश्चित अशी उद्दिष्टये असतात. निश्चित उद्दिष्ट्ये ठेवूनच संशोधन केले जाते. प्रस्तुत संशोधनाची काही उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे नोंदविता येतील.

- सावित्रीबाई फुले यांच्या पूर्व काळातील शैक्षणिक आणि सामाजिक स्थितीचे अध्ययन करणे.
- सावित्रीबाई फुले यांचा जीवनकाल अभ्यासणे.
- सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक कार्याचे अध्ययन करणे.
- सावित्रीबाई फुले यांचे सामाजिक कार्यातील योगदानाचे अध्ययन करणे.
- सावित्रीबाई फुले यांचे स्त्री शिक्षणातील योगदानाचे अध्ययन करणे.
- जातीभेद तसेच अस्पृश्यता निर्मूलन तसेच अस्पृश्यासाठी शिक्षण यातील योगदानाचा अभ्यास करणे.

- विधवांचे प्रश्न सोडविणे, विधवा पुर्नविवाह तसेच वालविवाहास केलेला विरोध इ. कार्याचा अभ्यास करणे.
- समाजातील सर्व स्तरातील लोकांना साक्षर करण्यासाठी प्रौढशिक्षण रात्रशाळा, उच्चशिक्षण तसेच प्राथमिक, माध्यमिक शिक्षणासाठी दिलेले महत्वपूर्ण योगदानाचा अभ्यास करणे.
- सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याचा ग्रामीण व शहरी भागातील समाज परीवर्तनावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहीतके:

संशोधन कोणतेही असो गृहीतकृत्याशिवाय पूर्ण होत नाही म्हणून गृहीतकृत्याच्या संदर्भात मॅकब्लॅक म्हणतात. "जे विधान निश्चितपणे बरोबर आहे की चूक आहे हे खात्रीपूर्वक माहित असत नाही त्या विधानांना गृहीतकृत्ये म्हणतात." परंतु हे विधान बरोबर ठरल्यास त्याने काय परिणाम होतील हे पाहण्यासाठी, विधान तपासून पाहिले पाहिजे.

एकूणच या विषयाच्या संदर्भात असलेले माझे पूर्वज्ञान, अभ्यास या आधारावर मी काही गृहीतकृत्ये मांडलेली आहेत. जी प्रत्यक्ष संशोधन केल्यानंतर सत्य ठरतील किंवा असत्य ठरतील अशी गृहीतकृत्ये खालीलप्रमाणे.

- सावित्रीबाई फुले यांच्या पूर्वकाळातील स्थिती समाजसुधारणेच्या विरूध्द होती.
- कर्मठ ब्राह्मणांच्या तसेच इतर समाजकंटकांच्या दूषित दृष्टीकोनामुळेच वेदोक्त संघर्ष निर्माण झाला.
- तत्कालीन समाजरचनेतील चातुर्वण्य व्यवस्थेला धक्का बसला.
- बहुजन समाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी शैक्षणिक कार्य सावित्रीबाई फुले यांनी सुरू केले.
- सामाजिक कार्यामुळेच अस्पृश्यांच्या विकासाचा पाया रचण्यास मदत झाली.
- समाजातील सर्व व्यक्तींना समान न्याय, वागणूक शिक्षण देण्यासाठी जातीय विषमता संपूर्णपणे नष्ट करण्याचा प्रयत्न सावित्रीबाई फुले यांनी केला.
- विधवा पुर्नविवाहास चालना देणे, त्यांचे प्रश्न सोडविणे तसेच बालविवाह प्रथेस बंदी

आणली.

- प्रौढशिक्षण, रात्रशाळा, उच्च शिक्षण इत्यादीच्या माध्यमातून शिक्षणाचे सार्वत्रिकरण केले.
- सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याचा समाज परिवर्तनावर मोठा प्रभाव पडला.
- ग्रामीण व शहरी भागातील महिलांमध्ये सावित्रीबाई फुले यांच्या कार्यामुळे मोठया प्रमाणात परिवर्तन झाले.
- सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक कार्याचा सामाजिक परीवर्तनावर सकारात्मक परिणाम झाला.

संशोधन पध्दती:

"सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याचा समाजावरील परिणामांचा समाजशास्त्रीय अभ्यास" या संशोधन विषयाच्या अभ्यासासाठी विश्लेषणात्मक पध्दतीचा वापर उपयुक्त होय. सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याचा आढावा संशोधनात वापरताना वर्णनात्मक पध्दतीनूसार मांडणी करणार आहे. सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा समाज परीवर्तनावरील परिणामांचा समाजशास्त्रीय अभ्यास करताना प्रश्नावलीच्या आधारे सामान्याकडून विशेषीकरणाच्या पध्दतीचा वापर करणार आहे.

तथ्यसंकलन:

प्रस्तुत विषयाचे तथ्यसंकलन करताना सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक आणि सामाजिक कार्याचा समाज परीवर्तनावरील परिणामांचा समाजशास्त्रीय अभ्यास संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांच्या आधारे तथ्यसंकलन करून सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची नोंद घेणारे ग्रंथ, मासिके, गौरवग्रंथ, पुस्तके, स्मरणिका, वर्तमानपत्रे, पत्रकार संघाचे ग्रंथालय, सार्वजनिक ग्रंथालये, वृत्तांत पत्रके याद्वारे माहितीचे संकलन करणार आहे. सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा समाज परीवर्तनावरील परिणामांच्या अभ्यासासाठी प्रश्नावलींचा वापर करणार असून आवश्यक त्या ठिकाणी तक्ता, आलेख पध्दतीचा वापर करणार आहे.

संशोधनाच्या मर्यादा:

“सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याचा समाजावरील परिणामांचा समाजशास्त्रीय अभ्यास” या विषयावर संशोधनासाठी काही मर्यादा येवू शकतात. सावित्रीबाई फुले यांच्या पूर्वकाळातील इतर समस्याची विस्तृत नोंद न घेता फक्त शैक्षणिक आणि सामाजिक कार्याची नोंद घेणार आहे.

सावित्रीबाई फुले यांचा जीवनकाळ फक्त थोडक्यात पाहणे जोतीबा फुले व सावित्रीबाई फुले यांनी एकत्रितपणे कार्य केले असताना फक्त सावित्रीबाई फुले यांच्याच शैक्षणिक आणि सामाजिक कार्यांची नोंद घेणार आहे. या मर्यादीत क्षेत्रात राहूनच संशोधन कार्य करणार आहे. व्यक्ती, स्थानिक कार्य, वैचारीक व बौध्दीक विचाराने घेतलेली नोंद ह्या संशोधनाच्या मर्यादा आहेत.

संशोधन आराखडा:

संशोधन कोणतेही असो आराखडयाची आवश्यकता असते म्हणूनच एकॉफ म्हणतात," निर्णय क्रियान्वित करण्याची स्थिती येण्यापूर्वीच निर्णय निर्धारित करण्याच्या प्रक्रियेला आराखडा म्हणतात.

प्रस्तुत संशोधन कार्य “सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याचा समाजावरील परिणामांचा समाजशास्त्रीय अभ्यास” या विषयाचे संशोधन करताना संशोधनाचा विषय, विषय निवडीचे उद्देश, विषयाची मर्यादा व व्याप्ती, विषयाची गृहीतकृत्ये यांचा आढावा भूमिकामध्ये घेण्यात येईल. सदरील संशोधनाच्या अभ्यासासाठी एकूण सात प्रकरणामध्ये विभागणी केलेली आहे.

संशोधनाची उपयुक्तता:

संशोधन कोणतेही असो त्या संशोधनाची उपयुक्तता असल्याशिवाय त्या संशोधनाला अर्थच उरत नाही. प्रस्तुत संशोधनाची उपयुक्तता खालीलप्रमाणे नोंदविता येतील.

- प्रस्तुत संशोधनात सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक कार्याचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अध्ययन करता येईल.
- प्रस्तुत संशोधनामुळे सावित्रीबाई फुले यांचे सामाजिक कार्य याचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करता येईल.
- प्रस्तुत संशोधनामुळे सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा समाज परीवर्तनावरील परिणामांचा अभ्यास करता येईल.

- प्रस्तुत संशोधनामुळे आजची जातीय विषमता दूर करण्यासाठी उपयुक्त ठरेल.
- प्रस्तुत संशोधन समाजाची स्त्री विषयक भूमिका तसेच मत बदलण्यास कारणीभूत ठरेल.
- प्रस्तुत संशोधन बहुजन समाजातील लोकांना शिक्षण विषयक प्रेरणा देण्यासाठी उपयुक्त ठरेल.
- प्रस्तुत संशोधन बालविवाह, विधवा पुर्नविवाह तसेच विधवांचे प्रश्न सोडविण्यासाठी उपयुक्त ठरेल.
- सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याचा समाज परीवर्तनावर झालेला परिणामांचा अभ्यासासाठी उपयुक्त ठरेल.
- आज विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात सावित्रीबाई फुले यांच्या कार्यामुळे ग्रामीण तसेच शहरी भागातील महिलांमध्ये परीवर्तन झाले असून आजच्या पिढीला त्यांच्या कार्याची महत्ता समजण्यासाठी अभ्यासासाठी प्रस्तुत संशोधन उपयुक्त ठरेल.

एकंदरीत प्रस्तुत संशोधन एका अर्थाने शैक्षणिक आणि सामाजिक समस्या सोडविण्यासाठी उपयोगी ठरणार आहे. तसेच समाज परीवर्तनात सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचे योगदान किती मोलाचे आहे. यासाठी हे संशोधन उपयोगी ठरणार आहे.

प्रकरणाची मांडणी:

प्रकरण पहिले

- **प्रस्तावना**

प्रकरण दुसरे

- **सावित्रीबाई फुले यांच्या पूर्वकाळातील शैक्षणिक आणि सामाजिक स्थिती**
- **सावित्रीबाई फुले यांचा जीवनकाळ**

प्रकरण तिसरे

- **सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक कार्य**
- शिक्षण सार्वत्रिकता
- अस्पृश्यासाठी शिक्षण
- स्त्री शिक्षण
- व्यावसायिक शिक्षण

प्रकरण चवथे

- **सावित्रीबाई फुले यांचे सामाजिक कार्य**
- जातीभेद व अस्पृश्यता निर्मूलन
- विधवा पुर्नविवाह व विधवांचे प्रश्न सोडविणे
- बालहत्या प्रतिबंधक गृह
- दूष्काळातील कार्य (१८६० आणि १८६९)

प्रकरण पाचवे

- **सावित्रीबाई फुले यांचे सामाजिक आणि शैक्षणिक कार्य व सामाजिक परिवर्तन**

प्रकरण सहावे

- **सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा समाज परीवर्तनावर झालेला परिणाम**
- सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक कार्याचा समाज परीवर्तनावर झालेला परिणाम
- सावित्रीबाई फुले यांच्या सामाजिक कार्याचा समाज परीवर्तनावर झालेला परिणाम

प्रकरण सातवे

- **निष्कर्ष**

संदर्भ ग्रंथसूची

०१.	सामाजिक संशोधन पध्दती	- डॉ. पु.ल. भांडारकर
०२.	संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्र	- डॉ. प्रदीप आगलावे
०३.	सामाजिक संशोधन पध्दती	- डॉ. दिलीप खैरनार, डॉ. किशोर राऊत
०४.	संशोधन पध्दती व संख्याशास्त्र	- ग.वि. कुभोजकर
०५.	सामाजिक संशोधन पध्दती	- डॉ. सुधीर बोधनकर, विवेक अलोनी
०६.	स्त्रीभूषण सावित्रीबाई फुले	- श्रीमती सरोज देशपांडे
०७.	ज्ञानज्योती माई सावित्रीबाई फुले	- प्रा. विजया इंगोले
०८.	सावित्रीबाई फुले	- प्रेमा गोरे
०९.	आम्ही सावित्रीच्या लेकी	- भारती पाटील
१०.	क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले	- डॉ. मा.गो. माळी
११.	क्रांतीदेवता साध्वी सावित्रीबाई फुले	- सौ. फुलवंताबाई झोगडे
१२.	सावित्रीबाई जोतीराव फुले	- कु. शांताबाई रघुनाथ बनकर
१३.	स्त्री शिक्षणाची वाटचाल	- सरोजनी बाबर
१४.	स्त्री प्रश्नाची चर्चा- एकोणीसावे शतक	- प्रतीभा रानडे
१५.	महात्मा जोतीराव फुले	- धनंजय कीर
१६.	जोतीरावांची समता संकल्पना	- भास्कर लक्ष्मण भोळे
१७.	महात्मा जोतीराव फुले	- पंढरीनाथ सिताराम पाटील
१८.	महात्मा जोतीराव फुले विशेषांक (विचार शलाका)	-संपादक- नागोराव कुंभार
१९.	अग्निफुले	- कृ.प. देशपांडे
२०.	स्त्री पुरूष तुलना	- ताराबाई शिंदे
२१.	स्त्रीविषयक दृष्टीकोन आणि संत कवयित्री	- प्रसाद कुलकर्णी

२२. स्त्रीयांचा सत्तेतील सहभाग सबलीकरणाच्या प्रक्रियेतील महत्वाचा टप्पा - प्रा. भारती पाटील

२३. स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रीयांचा सहभाग - श्रीमती सुमित्रा पाटील, डॉ. माया पाटील

२४. काळा आणि कर्तृत्व - संपादन - महाराष्ट्र संस्कृती मंडळ

२५. स्त्री चळवळीची वाटचाल - वि. रा. देव

संशोधक

भाग्यश्री उत्तमराव बारशे

मार्गदर्शक

डॉ. नानासाहेब बालासाहेब पाटील

समाजशास्त्र विभागप्रमुख

माधवराव पाटील महाविद्यालय पालम